I.I.F.-I (एकीकृत अन वेषणफ्रॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

पोलीस निरीक्षक (प्र.) सटाणा पोलीस ठाणे (नाशिक ग्रा.)

1. District (जिल्हा): नाशिक ग्रामीण P.S. (पोलीस ठाणे): सटाणा Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0307 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 10/06/2026 08:58 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मंगळवार Date from (दिनांक पासून): 09/06/2026 Date To (दिनांक पर्यंत): 09/06/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५ Time From (वेळेपासून): 12:50 तास Time To (वेळेपर्यंत): 13:02 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 10/06/2026 Time (वेळ): 03:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 004 Date and Time (दिनांक आणि वेळ): 10/06/2026 03:10 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 0.08 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): रेकर्ड रूममध्ये, सटाणा तहसिलदार कार्यालयातील, सटाणा,सटाणा-423301

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):



Scanned with CamScanner

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): स्वाती गोविंदराव पवार

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1978

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, नाशिक, सरकार वाडा, नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, नाशिक, नाशिक रोड, नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-7768004999



Scanned with CamScanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनिषा नारायण बाविस्कर | | | 1. शरद वामन कापुरे यांचे वर,पाठक मैदान,Town/Village (शहर / गाव): सटाणा,Tehsil (तहसील): सटाणा,Police Station (पोलीस ठाणे): सटाणा,District (जिल्हा): नाशिक ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र-423301,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दहा हजार रूपये रोख त्यात 500 रूपये दराच्या 20 चलनी नोटा | 10,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 10,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद सटाणा पोलीस स्टेशन,नाशिक ग्रामीण.



Scanned with CamScanner

दिनांक :- 10/06/2026

मी स्वाती गोविंदराव पवार, वय 48 वर्षे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक. मोबा.7768004999

सरकारतर्फे फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक या कार्यालयात सुमारे 1 वर्षापासुन कार्यरत आहे.

दिनांक 24/04/2026 रोजी आम्हास मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि नाशिक यांनी कळविले की श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नाशिक येथे संपर्क करून त्यांची लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे कळविले आहे तुम्ही त्यांचेशी संपर्क करून पुढिल कार्यवाही करा असे कळविले. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) यांना आमचे कक्षामध्ये बोलावून लोकसेवक हे आपणास कधी भेटणार आहे असे विचारले असता लोकसेवक हे सोमवार मंगळवार या दिवशी ब्राम्हणगाव सजा येथे कामकाज करतात लोकसेवक हे तक्रारदार यांना सोमवार म्हणजेच दिनांक 27/04/2026 रोजी भेटणार असल्याचे व तक्रारदार हे दिनांक 27/04/2026 रोजी त्यांची तक्रार देणार असल्याचे त्यांनी कळविले. त्याप्रमाणे आम्ही प्रकल्प अधिकारी, एकामिक आदिवासी विकास प्रकल्प,नाशिक यांना दि.24/04/2026 रोजी दिलेल्या पत्रान्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथे दिनांक 27/04/2026 रोजी सकाळी 08::30 वाजता पंच श्री..अभिजीत जिजाबा खोड,वय-41वर्षे,व्यवसाय-नोकरी, कनिष्ठ लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक रा. मैथलीधाम सोसायटी ई-1 फलॅट न 2 तिडके कॉलनी,नाशिक 2) श्री.प्रदीप हरीदास गोजरे, वय-38,वर्षे व्यवसाय-नोकरी प्रयोगषाळा सहायक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक रा. शिवलीला रो.बंगलो नं.32, सप्तरंग कॉलनीमागे, आर.टी.ओ ऑफिसजवळ, नाशिक हे आमचे कक्षात हजर झाले. आम्ही पंचाना कळविले की श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) नावाचे एक तक्रारदार सटाणा येथे उपस्थित असून त्यांचेशी आम्ही संपर्क केला व त्यांची लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे कळविले. तेव्हा आम्ही नमुद दोन्ही पंचास कळविले की, आपण सदर सापळा कारवाईत पंच म्हणुन काम करण्यास तयार आहेत काय बाबत आम्ही पंचाची समंती घेतली. त्यानंतर तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) यांची तक्रार ऐकून तक्रार नोंदवून त्याप्रमाणे लोकसेवक हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करण्यासाठी सटाणा येथे जायचे आहे. त्यानंतर आम्ही आमचे कक्षात उपस्थीत असलेले पोहवा.हैबाडे, पोहवा.खांडवी, तसेच चापोहवा विनोद पवार यांची पंचाना ओळख करून दिली. त्यांनतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य असे सापळयाकामी लागणाऱ्या सर्व साहित्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयातून शासकीय वाहन क्रमांक एम.एच.15 जे.एस.3092 या वाहनाने पंचासह दिनांक 27/04/2026 रोजी 09.05 वा.सुमारास सटाणा येथे रवाना झालो. आम्ही चापोहवा विनोद पवार यांना शासकीय वाहन चालवुन सटाणा ते मालेगाव रोडने सटाणा येथील समर्थ हार्डवेअरच्या जवळ रोडच्या कडेला असलेल्या मोकळया जागी आलो असता तेथे चापोहवा विनोद पवार यांनी आमचे सुचनेप्रमाणे वाहन थांबविले. तेव्हा आमचे जवळ एक इसम मोटारसायकलसह येवून आपण ॲन्टी करप्शन ब्युरो नाशिक येथून आलात काय? बाबत विचारणा केली. तेव्हा आम्ही त्यांना होय म्हणुन कळविले. तेव्हा सदर इसमाने त्यांचे नाव श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) असे सांगून तेच तक्रारदार असलेबाबत कळविले. त्यानंतर आम्ही त्यांना



Scanned with CamScanner

आमचेकडील शासकीय वाहनात बसवून घेवून आमची व संपुर्ण सापळा पथकाची तसेच पंचाची ओळख त्यांना करून दिली त्यानंतर तक्रारदार यांची तोंडी तक्रार ऐकून घेवून आम्ही त्यांना त्यांची तक्रार त्यांचे हस्ताक्षरात लिहीण्यास सांगीतली तेव्हा त्यांनी स्वहस्ताक्षरात तक्रार लिहून दिली ती, मी श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) वय 58 वर्षे धंदा-शेती रा. फ्लॅट नं.7 कृष्णा अपार्टमेंट श्रीकृष्ण कॉलनी बजरंग पुलाजवळ जळगाव जि. जळगाव मुळ राहणार ब्राम्हणगाव ता. सटाणा जि. नाशिक भ्रमणध्वनी 9822826385

समक्ष तक्रार लिहून देतो की मी वरील ठिकाणी पत्नी व मी असे राहत असून माझा शेती व्यवसाय आहे.

मी दिनांक 08/06/2015 रोजी मौजे ब्राम्हणगाव गट क्रमांक 824 मधील क्षेत्रावर भाऊसाहेब हिरे वि.वि.का. सोसायटी ब्राम्हणगाव यांचेकडून 400000/-रू बोजा चढवून कर्ज घेतले होते. त्यापैकी मी काही हप्ते भरून नंतर कर्ज मला शासनाकडून कर्जमाफीने माफ झाले. परंतु शेतावरील कर्जाचा बोजा कमी झालेला नव्हता. त्यामुळे मी ग्राममहसुल अधिकारी मनिषाताई बाविस्कर यांना दिनांक 16/04/2026 रोजी अर्ज दिला होता. तसेच दिनांक 15/04/2026 रोजी तहसिलदार सो. बागलाण यांना मौजे ब्राम्हणगाव येथील माझे शेत गट क्र. 824मध्ये माझे नाव शैलेंद्र शिवाजीराव अहिरे असे क्षेत्राचे 7/12 उता-यावर नावावर असून मी शैलेंद्र शिवाजीराव पाटील असे माझे कागदोपत्री नाव असून त्याप्रमाणे नाव 7/12 उता-यावर लागावे म्हणुन मी अर्ज दिलेला आहे. तरी माझे नमुद दोन्ही कामे करून देण्यासाठी तलाठी मनिषा बाविस्कर मॅडम हया त्यांचेसाठी व मंडळ अधिकारी यांचेसाठी 10,000/-रू दिनांक 16/04/2026 रोजी ब्राम्हणगाव तलाठी कार्यालय येथे पैशांची मागणी केली होती. व तुम्ही शेतावरील बोजा कमी करून देण्यासाठी व सदर 7/12 उता-यावर अहिरे नावाऐवजी पाटील असे आडनावाची दुरूस्ती करून देण्यासाठी दिनांक 27/04/2026 रोजी मला भेटा तेव्हा मी तुमच्याशी पैशाविषयी बोलेल असे मला म्हणाल्या. म्हणुन मला त्यांना माझे काम करून देण्यासाठी त्यांना किंवा त्यांचे वरिष्ठांना 10,000/-रू देण्याची मुळीच ईच्छा नाही व त्यांचे व माझेत कोणताही उधार उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच आपसात वाद देखील नाही. तरी आपलेकडून त्यांचेवर योग्य ती कार्यवाही होणेसे विनंती आहे. वगैरे मजकुरची लेखी तक्रार सहीनिशी लिहून दिली. त्या तक्रारीवर आंम्ही व दोन्ही पंचानी वाचुन समक्ष म्हणुन आमची व दोन्ही पंचानी सहया केलेल्या आहेत.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 27/04/2026 रोजी आम्ही थांबलेल्या ठिकाणापासुन शासकीय वाहनाजवळून तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) व पंच नं. 1 श्री. खोड यांना व सापळा पथक यांना पडताळणी कारवाईच्या अनुषगाने सुचना देवून आम्ही डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये नवीन पाकीटामधील सॅन्डीस्क कंपनीचे कोरे नवीन मेमरीकार्ड टाकुन त्याची माहिती दिली. तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) यांचेकडे लोकसेवक मनिषा बाविस्कर तलाठी ब्राम्ह तपास अधिकारी - श्रीमती. रूपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नाशिक, मोबा. 8379961020 णगाय ह्या खरोखर लाचेची मागणी करतात का? याची पडताळणी करणेकामी तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री. खोड अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन तक्रारदार यांनी आणलेल्या मोटारसायकल क्रमाक एम एच 41 अे.वाय 7236 हिचेने साधारण 14/51 वाजेचे सुमारास जिजामाता मराठा हायस्कुल सटाणा ता. बागलाण जि. नाशिक येथे लोकसेवक मनिषा बाविस्कर तलाठी यांचे प्रशिक्षण



Scanned with CamScanner

असल्याने तेथे त्यांच्या भेटीसाठी रवाना केले होते. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच श्री. खोड असे जिजामाता मराठा हायस्कुल सटाणा येथे शाळेत जावुन लोकसेवक मनिषा बाविस्कर ग्राममहसुल अधिकारी, तलाठी यांची नमुद शाळेच्या बाहेर मोकळया जागी भेट घेतली असता तक्रारदार यांनी त्यांचे 7/12 उता-यावरील बोजा कमी करण्यासाठी व आडनावामध्ये बदल करण्यासाठी तहसिल कार्यालयात सटाणा येथे दिलेल्या अर्जाप्रमाणे त्यांचे 7/12 उता-यावर आडनाव अहिरे ऐवजी पाटील असे लागण्यासाठी चर्चा करीत असताना सगळयांच एकत्र करून सांगा ना मॅडम तेव्हा श्रीमती मनिषा बाविस्कर तक्रारदारास म्हणाल्या तस नाही त्यांना विचारून कराव लागेल. तेव्हा तक्रारदार त्यांना म्हणाले सांगाना अंदाज तरी तेव्हा श्रीमती बाविस्कर तक्रारदारास म्हणाल्या ते घेतात काहीतरी दहा घेतात वाटत. तेव्हा तक्रारदार म्हणाले किती तेव्हा श्रीमती मनिषा बाविस्कर तलाठी तक्रारदारास म्हणाल्या दहा घेवून या तेव्हा तक्रारदार त्यांना म्हणाले दहा जास्त होताना, त्यानंतर तक्रारदार म्हणाले दहा हजार का? तेव्हा लोकसवेक श्रीमती मनिषा बाविस्कर तलाठी तक्रारदारास म्हणाल्या, हो. तेव्हा तक्रारदार म्हणाले दहा हजार घेतील. तेव्हा लोकसेवक श्रीमती मनिषा बाविस्कर तक्रारदारास म्हणाल्या हमं. तेव्हा तक्रारदार म्हणाले बघा पाचमध्ये मिटवल तर बर होईल तेव्हा लोकसेवक श्रीमती मनिषा बाविस्कर म्हणाल्या तुम्ही या वाटल तर उदया सकाळी लवकर या वाटल तर बोलून घेवू. त्यानंतर तक्रारदार यांना श्रीमती मनिषा बाविस्कर म्हणाल्या बर काम कुठपर्यत आलय काम वैगरे सगळ मी बघुन घेईल मी आणि त्यांना सांगते तुम्ही काय करायच ते करा तेव्हा पण आता काही नका. कारण माझा त्याच्यात काही विषय नाही पण तुम्हाला मदत होईल. नाहीतर तुम्ही डायरेक्ट टेबलला गेले सर म्हणा हे अस अस माझ काम ये मी टपालात टाकल ये मला काय परत परत यायला जमनार नाही, कधी पर्यत आदेश हाईल ते बी सांगा आणि काय असेल ते पण सांगा आणि करून ठेवा म्हणा. असे म्हणाल्या. त्यानंतर चर्चे दरम्यान तक्रारदार त्यांना म्हणाले आता ते फीच कस? तेव्हा लोकसेवक श्रीमती मनिषा बाविस्कर म्हणाल्या हंम ते तुमच्या पध्दतीने देवून टाका, अशाप्रकारे तक्रारदार यांचे काम करून देण्यासाठी लोकसेवक श्रीमती मनिषा बाविस्कर यांनी तक्रारदार यांचेकडे स्वतासाठी व मंडळ अधिकारी यांचेसाठी 10000/-दहा हजार रूपये लाचेची मागणी केली आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.त्याप्रमाणे दिनांक 28/04/2026 रोजी आम्ही व दोन्ही पंच व सापळा पथक पोहवा हैंबाडे, पोहवा खांडवी चापोहवा विनोद पवार असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नाशिक येथून सकाळी 10/05 वा. सुमारास शासकीय वाहन क्रमांक एम एच 15 जे.एस. 3092 हिचेने चापोहवा विनोद पवार यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणारे साधन सामग्री घेवून सटाणा येथे रवाना झालो. सटाणा मालेगाव रोड सटाणा येथे श्रीसमर्थ हार्डवेअरच्या जवळ असलेल्या मोकळया जागी चापोहवा विनो पवार यांना त्यांचे ताब्यातील वाहन थांबविण्यास सांगीतले ती वेळ 12/30 वाजेची होती. तेव्हा तेथे तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) हे त्यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एम एच 41 ओ.व्ही.1778 हिचेसह उपस्थित होते.

तक्रारदार यांना लोकसेवक मनिषा बाविस्कर तलाठी हया व मंडळ अधिकारी श्री.भामरे यांची भेट घेवून त्यांचेशी लाचेच्या रक्कमेसंदर्भाने बोलण्यासाठी पाठविणे असल्याने आम्ही तक्रारदार यांना विचारले की ते तुम्हाला कोठे भेटतील तेव्हा तक्रारदार म्हणाले की जनगणना संदर्भाने त्यांचे प्रशिक्षण चालु आहे ते प्रशिक्षण संपल्यावर तहसिल कार्यालय सटाणा येथे भेटतील. त्याप्रमाणे



Scanned with CamScanner

आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर तलाठी व श्री. भामरे मंडळ अधिकारी यांची भेट घेवून त्यांचेशी लाचेच्या रक्कमेची बोलणी करण्यासाठी तहसिल कार्यालय येथे संचिका काढण्यासाठी अर्ज घेवून तक्रारदार यांना तेथे बोलाविले आहे. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेंद्र पाटील(अहिरे) व पंच नं. 1 श्री. खोड यांना व सापळा पथक यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवून आम्ही डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर दाखवून त्यामध्ये नवीन पाकीटामधील कोरे नवीन मेमरीकार्ड टाकुन त्याची माहिती दिली. तक्रारदार श्री. शैलेंद्र पाटील(अहिरे) यांचेकडे लोकसेवक मनिषा बाविस्कर व लोकसेवक श्री. भामरे मंडळ अधिकारी हे तक्रारदार यंाचेकडे लाचेची मागणी करतात का याची पडताळणी करणेकामी तक्रारदार व पंच क्रमांक 1 श्री. खोड अशांना पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन 17/08 वा.व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करुन तक्रारदार यांना लोकसेवक मनिषा बाविस्कर व लोकसेवक श्री. भामरे मंडळ अधिकारी यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय सटाणा येथे तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एम एच 41 ए.व्ही.1778 हिचेने रवाना केले होते. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच श्री. खोड असे तहसिल कार्यालय सटाणा येथे कार्यालयात जावून त्यांची भेट झाली. तेव्हा मनिषा बाविस्कर तक्रारदारास म्हणाल्या की तुमचा संचिका मिळण्यासाठीचा अर्ज टपालामध्ये देवून टाका मी उद्या नाही माझे प्रशिक्षण चालू आहे असे म्हणुन कामासंदर्भाने चर्चा केली. तसेच तहसिल कार्यालय येथे श्री. भामरे मंडळ अधिकारी ब्राम्हणगाव हे उपस्थित होते तेव्हा तक्रारदार व पंच श्री. खोड यांनी त्यांची भेट घेतली असता त्यांचेशी तक्रारदार यांनी त्यांचे कामासंदर्भाने चर्चा केली परंतु त्यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली नाही त्यानंतर तक्रारदार व पंच असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले व व्हाॅईस रेकाॅर्डर आम्ही बंद केले ती वेळ 17/59 वाजेची होती. तसा सविस्तर पंचनामा स्क्रिप्टसह केलेला आहे.

दिनांक 08/06/2026 रोजी तक्रारदार श्री. शैलेंद्र पाटील(अहिरे) हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नाशिक येथे आले व त्यांनी आमची भेट घेतली व आम्हाला सांगीतले की दिनांक 09/06/2026 रोजी लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर तलाठी ब्राम्हणगाव यांनी त्यांना तक्रारदार यांचे नावाचे राजपत्र व इतर कागदपत्रे घेवून त्यांचे भेटीसाठी ब्राम्हणगाव किंवा तहसिल कार्यालय सटाणा येथे बोलाविले आहे.

त्याप्रमाणे तक्रारदार हे दिनांक 09/06/2026 रोजी लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर तलाठी यांची भेट घेवून लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी जाणार असल्याने आम्ही सापळा पथकासह श्रीराम सजन अहिरे नूतन इंग्लिश स्कुल ब्राम्हणगाव च्या वाॅलकंपाउडचे बाहेर रोडच्या कडेला मोकळ्या जागी पोहचलो. त्यावेळी तक्रारदार यांचेकडे त्यांनी हजर केलेली 10,000/- दहा हजार रू लाचेची रक्कम अॅन्थ्रासीन पावडर लावून ती लोकसेवक मनिषा बाविस्कर ह्या सफेत रंगाचे पाकीटामध्ये घालून स्विकारणार असल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले त्याप्रमाणे सफेत पाकीटामध्ये लाचेची रक्कम अॅन्थ्रासिन पावडर लावून व सफेत पाकीटास देखील अॅन्थ्रासिन पावडर लावून तक्रारदार यांचे शर्टाचे डावे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर तेथून तहसिल कार्यालय सटाणा समोरील रोडच्या कडेला असलेल्या मोकळया पार्कीगमध्ये शासकीय वाहनाने व तक्रारदार यांचेकडील स्विफट कार क्रमांक एम एच 19 ए.पी.4851 हिचेने तेथे आलो. त्यानंतर तक्रारदार यांचे यांचेकडे व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते चालु करुन तक्रारदार व पचं नं. 1 श्री. खोड यांना तहसिल कार्यालय



Scanned with CamScanner

सटाणा येथे 12/49 वाजेचे सुमारास पायी चालत रवाना केले होते. त्यावेळी तक्रारदार व पंच नं. 1 असे तहसिल कार्यालयात रेकॉर्डरूमध्ये जावुन लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर तलाठी ब्राम्हणगाव यांची भेट घेतली व तक्रारदार यांनी त्यांचे कामाबाबत चर्चा केली तेव्हा तक्रारदार श्री. शैलेंद्र पाटील(अहिरे) लोकसेवक मनिषा बाविस्कर तलाठी यांना तक्रारदार शैलेंद्र पाटील(अहिरे) यांचे शैलेंद्र शिवाजी अहिरे नावाचे शैलेंद्र शिवाजीराव पाटील असे राजपत्र केलेली झेरॉक्स व त्यांनी शैलेंद्र शिवाजीराव पाटील नावाचा केलेल्या अर्जाची झेरॉक्स व प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स लोकसेवक मनिषा बाविस्कर यांना दिले तेव्हा त्यांचेतील संभाषणादरम्यान लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर ह्या तक्रारदार यांना पंचासमक्ष म्हणाल्या की तेवढे देवुन द्या मग, तेव्हा त्यांना तक्रारदार श्री. शैलेंद्र पाटील(अहिरे) म्हणाले की मॅडम दहा हजार रूपये दिले हं. तेव्हा लोकसेवक मनिषा बाविस्कर तक्रारदार यांना म्हणाल्या की ओके. तेव्हा तक्रारदार लोकसेवक मनिषा बाविस्कर यांना म्हणाले की तुम्हाला जेवढे लागतील अ न ते बाकीचे पण बघा तेव्हा लोकसेवक तक्रारदारास म्हणाल्या की एवढे कशाला दिले तेव्हा तक्रारदार लोकसेवक यांना म्हणाले की त्यांचे तुम्ही म्हणत होते ना. तेव्हा लोकसेवक तक्रारदारास म्हणाल्या हो. पण कस ये ते तस नाही म्हणत मी मी आधी कागदपत्र बघितले असते सगळ हे केल असते. तेव्हा तक्रारदार म्हणाले ठिक ये ना, दोन महिने, हे बघा आम्ही तुमच्याकडे सुपूर्त केल ये तुम्ही व्हॉटसअपला करून टाका असे म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे उजवे हाताने त्यांचे शर्टाचे डाव्या खिशात सफेत पाकीटामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढून लोकसेवक मनिषा बाविस्कर यांचे समोर धरली त्यांनी त्यांचे उजवे हाताने लाचेची रक्कम स्विकारून ती त्यांचे लॅपटॉपचे काळया बॅगच्या कप्यामध्ये ठेवली. त्यांनतर लोकसेवक मनिषा बाविस्कर तलाठी यांनी लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा सापळा पथक यांनी तहसिल कार्यालयाचे रेकॉर्डरूममध्ये लोकसेवक मनिषा बाविस्कर यांना सापळा रंगेहाथ पकडले आहे. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी यातील लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर वय 36वर्षे व्यवसाय-नोकरी ग्राम महसुल अधिकारी(तलाठी) सजा ब्राम्हणगाव ता. बागलाण जि. नाशिक रा. श्री. शरद वामन कापुरे यांचे वरच्या मजल्यावर पाठक मैदान, सटाणा ता. बागलाण जि. नाशिक यांनी दिनांक 27/04/2026 रोजी पडताळणी पंचनामा कारवाई दरम्यान तक्रारदार श्री.शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) यांचे मौजे ब्राम्हणगाव येथील गट न. 824 मधील क्षेत्रावर भाउसाहेब हिरे वि.वि. का. सोसायटी ब्राम्हणगाव यांचेकडून 400000/-रू बोजा कमी करण्यासाठी व नमुद गट नंबर 824 चे 7/12 उता-यावर तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजी अहिरे हे नाव श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील असे दुरूस्त करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे त्यांचेसाठी व मंडळ अधिकारी यांचेसाठी 10000/- दहा हजार रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

दिनांक 09/06/2026 रोजी तक्रारदार श्री. शैलेंद्र शिवाजीराव पाटील(अहिरे) हे पंच नं. 1 श्री. खोड यांचेसह लाचेची रक्कम 10000/-रू लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर वय 36वर्षे व्यवसाय-नोकरी ग्राम महसुल अधिकारी(तलाठी) सजा ब्राम्हणगाव ता. बागलाण जि. नाशिक यांना देण्यासाठी तहसिल कार्यायातील रेकॉर्डरूममध्ये पंच नं. 1 श्री. खोड यांचेसोबत गेले असता लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर तलाठी यंानी तक्रारदार यांचेकडून त्यांचे वरील नमुद प्रलंबित काम करून देण्याचे मोबदल्यात स्वतःसाठी व मंडळ अधिकारी यांचेकरीता सफेत कागदी पाकीटात



Scanned with CamScanner

लाचेची रक्कम 10000/- दहा हजार रूपये 13/02 वाजेच्या दरम्यान स्विकारून दोन्ही हाताने मोजून ती पुन्हा त्याच सफेत कागदी पाकीटमध्ये ठेवून पाकीट हे लॅपटाॅपचे बॅगमध्ये ठेवून दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक मनिषा बाविस्कर यांचेशी त्यांचे कामासंदर्भाने चर्चा केली व त्यानंतर तक्रारदार यांनी पुर्वनियोजित इशारा कार्यालयाचे बाहेर येवून केला असता त्यानंतर तक्रारदार यांचे ताब्यातील व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केले ती वेळ 13/24 वाजेची होती. त्यावेळी लोकसेवक मनिषा नारायण बाविस्कर वय 36वर्षे व्यवसाय-नोकरी ग्राम महसुल अधिकारी(तलाठी) सजा ब्राम्हणगाव ता. बागलाण जि. नाशिक रा. श्री. शरद वामन कापुरे यांचे बंगल्याचे वरच्या मजल्यावर पाठक मैदान, सटाणा ता. बागलाण जि. नाशिक यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तक्रारदार यांचे प्रलंबित काम करून देण्यासाठी नमुद लोकसेवक यांनी त्यांच्या पदाच्या नात्याने करणे आवश्यक असलेले काम पार पाडण्यासाठी कायदेषिर परिश्रमिकेखेरीज पारितोषण 10000/- हजार रुपयेची लाच स्विकारुन आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भ्रश्ट व बेकायदेशिर मार्गाने स्वतःचा आर्थीक लाभ करुन घेतला. म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे म्हणून माझी सरकारतर्फे त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली

दि.10/06/2026

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** yogesh chandrakant patil (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**



Scanned with CamScanner

पोलीस निरीक्षक
सटाणा पोलीस ठाणे (नाशिक ग्रा.)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
सटाणा पोलिस ठाणे (ना.ग्रा.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

(स्वाती पवार)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): yogesh chandrakant patil

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner